C. S. (M) ... 2012

E-DTN-M-JMD-13

# MARATHI

## (Compulsory)

*Time Allowed : Three Hours* | *Maximum Marks : 300*

---

*INSTRUCTIONS*

***Candidates should attempt ALL questions. The number of marks carried by each question is indicated at the end of the question.***

***Answers must be written in Marathi (Devanagari Script) unless otherwise directed.***

***Prescribed word limit must be followed for Question No. 3.***

***The précis must be attempted ONLY on the special précis sheet(s) provided separately. These précis sheets are to be securely attached to the answer-book.***

***IMPORTANT : Whenever a question is being attempted, all its parts/sub-parts must be attempted contiguously. This means that before moving on to the next question to be attempted, candidates must finish attempting all parts/sub-parts of the previous question attempted. This is to be strictly followed.***

***Pages left blank in the answer-book are to be clearly struck out in ink. Any answers that follow pages left blank may not be given credit.***

---

1. पुढीलपैकी कोणत्याही ***एका*** विषयावर निबंध लिहा (300 शब्द) : *100*

(अ) भारत : एक उदीयमान व्यावसायिक विकास स्थळ.

(ब) आमची महानगरे स्त्रियांसाठी किती सुरक्षित आहेत ?

(क) वन्यप्राण्यांचे संरक्षण आणि व्यवस्थापन.

(ड) भारतातील व्यावसायिक शिक्षण.

(इ) चित्रपटातील मिथक संसार.

2. पुढील उतारा काळजीपूर्वक वाचून त्याच्यावर आधारित खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. उत्तरे संक्षिप्त, सुस्पष्ट व बरोबर असावीत. *6×10=60*

बहुसंख्य वाचक क्षणिक रंजनासाठी किंवा करमणुकीसाठी वाचन करतात. किंवा वाचनातून मिळणाऱ्या विश्रांतीसाठी करतात. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर ते वेळ घालविण्यासाठी वाचन करतात. वेळेच्या बाबतीत नेहमी बघितले आणि म्हटले जाते की वेळ बहुमोल आहे. वाचक हा बहुमोल वेळ उगाच घालवितात. ऐकायला अविश्वसनीय वाटते की वेळेचे त्यांच्यावर दडपण असते. आणि त्यातूनच त्यांना वाटत असावे की वेळेच्या या दडपणातून त्यांची सुटका पुस्तके करू शकतात. हे तर आता उघडच आहे की पुस्तके वाचण्यामागे त्यांचे इतर काहीही प्रयोजन

नसते. एखाद्या विशिष्ट आणि चांगल्या भूमिकेतून त्यांना वाचन करता आले तर नक्कीच वाचनातून त्यांच्या हाती काही येईल. मात्र असे काही दिसून येत नाही. वाचनाचा नक्कीच त्यांच्यावर काही परिणाम होत असणार. परंतु त्या परिणामाबाबत ते अनभिज्ञ असतात. वाचनाचे चांगले परिणाम होऊ शकतात किंवा अपायकारक होऊ शकतात. पण त्याबद्दल स्पष्ट काहीच सांगता येण्यासारखे नाही. कारण वाचनातून त्यांना काही सिद्ध झाले असे सांगण्यासाखे त्यांच्याकडे काहीच नसते.

(अ) लोक पुस्तके का वाचतात ? त्याच्या कारणांबद्दल लेखकाला काय म्हणायचे आहे ?

(ब) लेखकाला असे कां वाटते की वाचकांना स्वतःच्या वेळेची किंमत नाही ?

(क) वाचकांच्या वेळेचा सदुपयोग झाला नाही, हे कशावरून इंगित होते ?

(ड) वाचन झाल्यानंतर वाचकांनी काय करायला पाहिजे ? असे लेखकाला वाचकांकडून अपेक्षा वाटते.

(इ) बेसावधपणे वाचनाबद्दल लेखकाचा दृष्टिकोन प्रतिकूल आहे का ?

(फ) लेखकाला कसे वाचक अपेक्षित आहेत ?

3. पुढील उताऱ्याचा साधारणपणे एक तृतीयांश शब्दात सारांश लिहा. सारांश शब्द संख्येच्या सीमेत नसेल तर तुमचे गुण कमी केले जातील. सारांश लिहिण्यासाठी दिलेल्या कागदांवरच सारांश लिहा व ते उत्तरपुस्तिकेच्या आत व्यवस्थित बांधा. *60*

पाणी हे पृथ्वीच्या 70% भागावर सर्वसाधारणपणे उपलब्ध असते. जागतिक पातळीवर पाण्याचा एकूण साठा 1·386 बिलियन क्यू. किमी. असून त्यापैकी जवळ-जवळ 97% पाणी हे खारट आहे आणि ते पिण्यास योग्य नाही. उर्वरित 3% पाणीच स्वच्छ आणि वापरण्यासाठी योग्य आहे. या स्वच्छ आणि वापरण्यास योग्य पाण्याचा 68·5% भाग ग्लेशियरच्या रूपात, पहाडांवर आणि बर्फ स्वरूपात असल्यामुळे आपणास उपलब्ध नाही. जवळ-जवळ 30% पाणी जमिनीच्या पोटात तर 0·9% पाणी जमिनीवर नदी, झरे आणि तळे यांच्या रूपात उपलब्ध आहे. बहुधा आपण नदी, झरे आणि तळे यांच्यातून दररोज उपलब्ध होणाऱ्या 70 क्यू. किमी. पाण्यावर निर्भर असतो आणि 70 क्यू. किमी. जमिनीच्या पोटातील पाण्यावर निर्भर असतो. हा पुरवठा आपणांस सहस्राधिक वर्षांपासून निर्बाधपणे उपलब्ध आहे. परंतु, मागील काही दशकांपासून विशेषतः घरगुती वापर, शेती आणि औद्योगिकीकरणामुळे पाण्याची मागणी फार वाढली आहे. 1940 साली जेव्हां जागतिक लोकसंख्या 2 बिलियन इतकी होती तेव्हां प्रत्येक माणसाला दरवर्षी 1000 क्यू. मीटरपेक्षाही कमी पाण्याची गरज होती. ई.स. 2000 साली जागतिक लोकसंख्या 6 बिलियन झाली आणि प्रत्येक माणसाची दरवर्षी पाण्याची गरजही 6000 क्यू. मी. इतकी वाढली. त्यामुळे उपलब्ध असलेल्या पाण्याच्या साठ्यावर ताण निर्माण झाला. विशेषतः

सघन लोकसंख्या असलेल्या भागात आणि जिथे पाणी कमी प्रमाणात उपलब्ध आहे अशा भागात. एकूण पाण्याचा 70% वापर शेती साठी, 22% उद्योगांसाठी तर 8% वापर घरगुती कामासाठी होतो. वाढती लोकसंख्या आणि त्यामुळे वाढत जाणारी पाण्याची मागणी यामुळे पाणी हे उत्तरोत्तर दुर्मिळ होत चालले आहे. सध्याच आपण दरवर्षी एकूण उपलब्ध पाण्याचा 50% वापर करीत आहोत. वाढती लोकसंख्या आणि मागणी यामुळे 2050 पर्यंत आपणास एकूण उपलब्ध पाण्याचा 74% साठा वापरासाठी लागेल. अमेरिकन लोक पाणी वापरण्याच्या बाबतीत फारच सढळ मानले जातात. जर सगळीकडे माणसे अमेरिकेतील सर्वसामान्य माणसासारखा पाण्याचा वापर करू लागली तर, पाण्याचा वापर 90% पर्यंत होईल.

वारण्यासाठी योग्य पाण्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ते जगात सर्वत्र सारखे उपलब्ध नाही. एकीकडे पाण्याच्या बाबतीत समृद्ध राष्ट्रे आहेत. तर दुसरीकडे कमी पाणी असलेली राष्ट्रे. ग्रीनलँड मध्ये दरवर्षी प्रत्येक माणसाला पाण्याची प्राप्यता. 10,767 मिलियन क्यू. मी. आहे तर कुवेत मध्ये फक्त 10 क्यू. मी. . भारतात 1951 साली प्रत्येक माणसास दरवर्षी 5,177 क्यू. मी. पाणी उपलब्ध होते. ते घसरून 2001 साली 1,820 क्यू. मी. इतके खाली आल्यामुळे भारताची गणना आता कमी पाणी असलेल्या राष्ट्रांत होऊ लागली आहे. 2025 सालापर्यंत तर पाण्याची प्राप्यता दरवर्षी प्रत्येक माणसाला फक्त 1,340 क्यू. मी. इतकी खाली जाण्याची शक्यता आहे.

जगातील अनेक नद्या आणि त्यांच्यात मिसळणारे इतर प्रवाह एकापेक्षा जास्त देशांतून वाहतात. उदाहरणार्थ गंगा आणि तिच्या साहाय्यक नद्या नेपाळ, भारत आणि बांग्लादेशातून वाहतात. सिंधू आणि तिच्या साहाय्यक नद्या भारत आणि पाकिस्तानातून वाहतात. देन्युबा नदीचे उगम जर्मनीत तर तिचा प्रवास हा ऑस्ट्रिया, स्लोवाकिया, हंगरी, क्रोएशिया, सर्बिया, रोमानिया, बल्गेरिया, माल्देविया आणि यूक्रेन या राष्ट्रांमधून होतो. जाम्बेजी नदी, जाम्बीया, अंगोला, नामीबिया, बोत्सवाना, झिंबाब्वे आणि मोझांबिक देशांतून वाहते. मिस्रची जीवनरेखा मानल्या जाणाऱ्या नाईल नदीचे उगम सूडान, इथियोपिया, केन्या रवांडा, बुरुंडी, युगांडा, तंझानिया आणि झायरे या आठ देशांमध्ये आहे. जेव्हां एखादी नदी एकापेक्षा अधिक देशांतून वाहते तेव्हां तिच्यात उपलब्ध पाण्याच्या वाटपावरून नेहमी वाद उद्भवतात. असे वाद अगदी 3000 वर्षे ईसा पूर्व काळात देखील दक्षिण आणि मध्य एशिया, मध्य युरोप आणि मध्यपूर्व एशियात उद्भवलेले होते. शेती, उद्योग धंदे, आणि घरगुती वापरासाठी पाण्याची मागणी दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे असे वाद अनेकवेळा गंभीर रूप धारण करतात तर काही वेळा ते आक्रमक रूप धारण करतात.

एकाच देशातून वाहणाऱ्या नदीच्या पाण्याचा वाटप हा देखील स्थानीय आणि प्रादेशिक पातळीवर एक संवेदनशील मुद्दा आहेच गौतमबुद्ध यांना देखील (ईसा पूर्व 563 – 483 साली) शाक्य आणि कोटिया यांच्यात रोहिणी नदीच्या पाणी वाटपावरून झालेल्या वादात मध्यस्थता करावी लागली होती.

4. खालील उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा : 20

I remember my father starting his day at 4 a.m. by reading the namaz before dawn. After the namaz, he used to walk down to a small coconut grove we owned, about 4 miles from our home. He would return, with about a dozen coconuts tied together thrown over his shoulder, and only then would he have his breakfast. This remained his routine even when he was in his late sixties.

I have throughout my life tried to emulate my father in my own world of science and technology. I have endeavoured to understand the fundamental truths revealed to me by my father, and feel convinced that there exists a divine power that can lift one up from confusion, misery, melancholy and failure, and guide one to one's true place. And once an individual severs his emotional and physical bondage, he is on the road to freedom, happiness and peace of mind.

**5.** खालील उताऱ्याचे इंग्रजीत भाषांतर करा : *20*

रुग्णालयांचा उगम ईसवी सनाच्याही फार वर्षांपूर्वी झाला असावा. या दिशेत ग्रीक, इजिप्त आणि भारतात पहिले पाऊल टाकले गेले. आता तर जगातील बहुसंख्य देशात अनेक प्रशस्त हॉस्पिटल सर्व-सामान्यांसाठी उघडली गेली आहेत. या रुग्णालयांमधून सर्व-सामान्यांसाठी उपचाराची सोय असून तिथे संशोधन आणि प्रशिक्षणासाठी देखील बऱ्यापैकी सोयी आहेत. काही लहान-मोठ्या रुग्णालयांमधून विशिष्ट रोगांचे उपचार केले जातात तर काही रुग्णालयांमधून मुले आणि स्त्रियांच्या उपचारासाठी विशेष सोयी उपलब्ध आहेत. इंग्लंड आणि अमेरिकेत तर रुग्णालयांना राज्यशासन किंवा नगरपालिकांकडून अनुदान मिळते किंवा त्यांचे प्रबंधन केले जाते. या पद्धतीमुळे आर्थिक अडचणी आणि कामातील अडथळे तर दूर झालेच पण एक सुव्यवस्थित यंत्रणेमुळे शक्तीचा योग्य वापर झाला आणि समाजाला एकूण लाभ झाला. अशा यंत्रणेमुळे एखाद्या निर्जीव, यांत्रिक आणि संथ व्यवस्थेवर मात करता येते. जी खर्चावर नियंत्रण नसल्यामुळे आणि टीकेच्या अभावी उद्भवते.

**6.** (अ) पुढीलपैकी कोणत्याही ***पाच*** वाक्प्रचारांचा/म्हणींचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा : 5

(i) अक्काबाईचा फेरा येणे

(ii) अत्तराचे दिवे जाळणे

(iii) विरजण पडणे

(iv) द्राविडी प्राणायाम करणे

(v) अनागोंदी कारभार

(vi) आकाशाला गवसणी घालणे

(vii) उजळ माथ्याने फिरणे

(viii) औषधावाचून खोकला जाणे

(ब) पुढीलपैकी कोणत्याही ***दहा*** शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा : 5

(i) आकाश

(ii) स्वस्त

(iii) जिवंत

(iv) सर्वप्रथम

(v) कठीण

(vi) कर्णमधूर

(vii) धट्टाकट्टा

(viii) निर्दय

(ix) कृतघ्न

(x) प्रशंसा

(xi) समाधानी

(xii) सुसंगत

(xiii) सुंदर

(xiv) सभ्य

(xv) विश्वसनीय

(क) पुढीलपैकी कुठल्याही ***एका*** कल्पनेचा विस्तार 20 वाक्यात करा : *10*

(i) भटाला दिली ओसरी नि भट हात पाय पसरी.

(ii) घरोघरी मातीच्याच चुली.

(iii) असंगाशी संग नि प्राणाशी गाठ.

(ड) पुढीलपैकी कोणत्याही ***एका*** विषयावर 15 वाक्यांचा संवाद लिहा : *10*

(i) लंडन ओलंपिक आणि भारतीय प्रदर्शन.

(ii) प्रदूषणाचा विळखा आणि आपले सण.

(iii) उच्चशिक्षण आणि मराठी भाषा.

(इ) पुढील कवितेचे 20 वाक्यात रसग्रहण करा : *10*

पुण्यमयी दे आम्हां अक्षर वरदान
ज्ञान बनो कर्मशील, कर्म ज्ञानवान

जातिभेद, धर्मभेद, वंशभेद दूर :
लाख लाख कंठातुन हाच एक सूर
करुणेच्या चरणांशी नत हो विज्ञान
पुण्यमयी दे आम्हां अक्षर वरदान

माणुसकी धर्माचा अर्थ जाणतो
श्रमनिष्ठा हे पवित्र तीर्थ मानतो
हृदयातुन समतेचा निर्भय अभिमान
पुण्यमयी दे आम्हां अक्षर वरदान

सेवेतच मुक्ती ही मंगल दीक्षा
न्यायास्तव जागृती ही सत्त्वपरीक्षा
हे विश्वचि घर अमुचे मंत्र हा महान
पुण्यमयी दे आम्हां अक्षर वरदान.